१ **सत्र प्रकरण क्रमांक १३४/२०२३**
**शासन वि. शेख अन्सार**
**निशाणी क्रमांक २४/क**

सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव :— मछिंद्र उध्दवराव दातार
वय :— ५५ वर्षे, व्यवसाय :— शिक्षक, आश्रमशाळा अंथरवणपिंप्री
राहणार :— भगवान राव भोसले नगर, ता. जि. बीड.

---

**सरतपासणी {ॲड.ए.बी.तिडके सहा.सरकारी वकील}**

०१. दिनांक २३.१२.२०२० रोजी मी माझे शाळेत होतो. त्यादिवशी आमचे मुख्याध्यापकांनी मला बोलावून घेतले. पिंपळनेर पोलीस स्टेशन आलेले होते व त्यांनी आमच्या सरांना पंच मिळण्यासाठी पत्र दिले. त्यांनी पत्रावर माझे व माझे सहकारी धम्मदिप जवंजाळ यांचे नाव सांगितले व आम्हाला पंच म्हणून जाण्यास सांगितले. मला आता दाखविण्यात आलेले **दिनांक २३.१२.२०२० रोजीचे पत्र** तेच असून त्यावर मुख्याध्यापकांनी माझे नावे आदेश केलेला आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर मुख्याध्यापकांची सही आहे. ते **निशाणी २५** वर आहे. त्यानंतर आम्ही बीड—पिंपळनेर रोडवर शाळेपासून २ कि.मी. अंतरावरील असलेल्या घटनास्थळावर गेलो. सदर घटना स्थळ हे सानप तलाठी यांनी दाखविले. ते बाभळीच्या झाडापासून १० ते १५ फुट अंतरावर होते. तेथे २० फुट रूंदीचा डांबरी रस्ता आहे. त्याच्या पुर्वेस पेट्रोल पंप आहे, पश्चिमेकडे आमची शाळा असून अंथरवनपिंप्री तांडा आहे. तेथे पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला व घटनास्थळाचा नकाशा काढला व तो आम्हाला वाचून दाखवून आमच्या सहया घेतल्या. मला आता दाखविण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर

आहे. तो घटनास्थळ पंचनामा **निशाणी २६** वर आहे. मी सदर घटनास्थळावर अर्धा तास होतो.

**उलटतपासणी आरोपी तर्फे विधीज्ञ एस.बी.शेख**

०२. मी सन १९९५ पासून सदर शाळेवर नोकरीस आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे शाळेच्या आजूबाजुला टपरी, घरे, दुकाने आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा पंचनामा पोलीसांनी आधीच तयार केलेला होता व त्यावर आम्हाला फक्त सह्या करण्यास सांगितल्या. मी घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी गेलो होतो त्यावेळी आमच्या शाळेमध्ये मी सुट्टीचा अर्ज दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर ठिकाणी प्रत्यक्ष गेलेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष दिली.

उलट तपास पुर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

स्वाक्षरीत/—

**( रेणूका एम. सातव )**

दिनांक : २९/०१/२०२६

अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बीड